Impact Factor 5.307 (SJIF)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी महात्मा गांधींनी उभारलेल्या राष्ट्रीय चळवळी

**प्रा. नरेंद्र व्ही. झाडे**
श्री. गोविंदप्रभू कला व वाणिज्य महाविद्यालय
तळोधी, बाळापूर, ता. नागभीड, जि. चंद्रपूर
मो. नं. ९९२३९८७८२१

---

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी जानेवारी १९१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेमधून भारतात आले. १९०९ मध्ये लिहिलेल्या 'हिंद स्वराज्य' या आपल्या पुस्तकामध्ये स्वराज्यासंबंधी त्यांनी विचार मांडले. मे १९१५ मध्ये त्यांनी आपल्या रचनात्मक कार्यासाठी अहमदाबाद येथील साबरमती नदीच्या काठी आश्रम स्थापन केला. चंपारण आणि खेडा मधील शेतीशी संबंधित वाद आणि अहमदाबाद येथील मंजूर लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी गांधीजींनी नेतृत्व प्रदान केले. त्यामुळे ते एक प्रभावशाली राजनेता म्हणून उद्यास आले. या तिन्ही ठिकाणी गांधीजींनी आपल्या सत्याग्रह नितीचा अवलंब केला. रौलेट कायद्याविरुद्ध सुद्धा त्यांनी सत्याग्रह सुरू केला. तसेच त्यांनी खिलाफत आंदोलनाला सहानुभूती व समर्थन दिल्यामुळे खिलापत आंदोलन अधिक शक्तीशाली बनले. त्यामुळे १९१९ मध्ये महात्मा गांधीला अखिल भारतीय खिलाफत संमेलनाचे अध्यक्ष बनविण्यात आले. त्यामुळे महात्मा गांधीजींचे नेतृत्व सर्वधर्मियांचे झाले. म्हणून संपूर्ण राष्ट्रीयत्वाचे नेतृत्वाचे गुण त्यांच्यामध्ये दिसू लागले. अशातच ०१ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण भारतातील राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व गांधीजीकडे आले. इथूनच भारतीय राष्ट्रीय चळवळीत गांधी युगाला प्रारंभ झाला. त्यांनी अहिंसा, असहकार, सत्य या तत्त्वांचा अंगिकार करून भारतीय राष्ट्राला स्वतंत्र करण्यासाठी चळवळी चालविल्या.

**असहकार चळवळ (१९२०) :**

डिसेंबर १९२० च्या नागपूर येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात असहकार चळवळ चालविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. तसेच या अधिवेशनात ब्रिटिश साम्राज्या अंतर्गतचे स्वशासन हे तत्व बदलून त्याच्या ऐवजी स्वराज्याच्या मागणीचा प्रस्ताव पास करण्यात आला. असहकार चळवळ महात्मा गांधीजींच्या नेतृत्वात सुरू केलेली पहिली जन चळवळ होती. ही चळवळ तीन प्रमुख मागणीसाठी सुरू केल्या गेली होती. १) खिलाफत मुद्दा, २) पंजाबमधील अत्याचाराविरुद्ध न्यायाची मागणी, ३) स्वराज्याची प्राप्ती. या चळवळीच्या कार्यक्रमाचे दोन भाग होते. १) नकारात्मक आणि २) सकारात्मक.

**नकारात्मक तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.**

१) सहकारी पदव्यांचा त्याग, स्थानिक संस्थांमधील पदाचा त्याग.

२) सरकारी व निमसरकारी समारंभाचा बहिष्कार.

३) सरकारी शाळांमधून विद्यार्थ्यांना हळूहळू काढून टाकावे.

४) वकील आणि न्यायाची मागणी करणाऱ्या लोकांनी ब्रिटिश न्यायालयावर बहिष्कार टाकावा.

५) सैनिक, कारकून आणि मजुरांनी मेसोपोटोनियामध्ये नोकर भरतीसाठी जाऊ नये.

६) उमेदवार व मतदारांनी विधानपरिषदांच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकावा.

७) विदेशी वस्तूचा बहिष्कार करावा.

**सकारात्मक तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.**

१) न्यायालयाच्या ठिकाणी पंचायतीची स्थापना करण्यात आली.

२) सरकारी शाळा, कॉलेज सोडणाऱ्यासाठी राष्ट्रीय विद्यालयाची स्थापना करण्यात आली.

३) स्वदेशी वस्तूचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न केले गेले.

४) चरखा आणि खादीला लोकप्रिय बनविण्यात आले.

५) स्वयंसेवक दलाची स्थापना करण्यात आली.

६) टिळक स्मारकासाठी 'स्वराज्य कोष' तयार करून एक करोड रुपये जमा करण्याचे ठरविले.

७) भारतीय घरामध्ये वीस लाख चरख्यांचे वितरण करण्याचे ठरविण्यात आले.

**असहकार चळवळीची प्रगती :**

०१ ऑगस्ट १९२० ला महात्मा गांधीजींनी स्वत:पासून असहकार चळवळीची सुरुवात केली. चळवळीची सुरुवात एका दु:खद गोष्टीने झाली. कारण त्या दिवशी मुंबईमध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. संपूर्ण देशामध्ये असहकार चळवळीला अभुतपूर्व यश प्राप्त झाले. देशाच्या विविध भागात विदेशी कपड्यांची होळी जाळण्यात आली. विधानमंडळ आणि शैक्षणिक संस्थांचा बहिष्कार करण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थे अंतर्गत शिक्षणासाठी जमिया मिलिया इस्लामिक आणि काशी विद्यापीठ अशा नवीन शैक्षणिक संस्थांची स्थापना केल्या गेली. न्यायालयाच्या बहिष्कारासाठी मोतीलाल नेहरू आणि चित्तरंजनदास यांनी वकिली सोडली. १७ नोव्हेंबर १९२१ ला मुंबईला 'प्रिंस ऑफ वेल्स'चे आगमन झाले. तेव्हा सर्वत्र राष्ट्रव्यापी हडताळ करण्यात आले. ब्रिटीश सरकारने काँग्रेस आणि खिलाफत स्वयंसेवक संघटनांना गैरकानुनी घोषित केले. चळवळीच्या सुरुवातीलाच ३०,००० लोकांनी स्वत:ला कैद करून घेतले. डिसेंबर १९२१ ला अहमदाबाद येथील काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजींनी व्हाईसरॉयला लिखित पत्र पाठवले की सात दिवसाच्या आत सरकारी अत्याचार बंद झाला नाही तर अजून मोठ्या स्वरूपात सविनय कायदा भंग चळवळ सुरू केल्या जाईल. परंतु सात दिवस पूर्ण होण्याच्या आधीच उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील गाव चौरीचौरा येथे जनतेने पोलीस स्टेशनवर हमला करून २२ पोलिसांची हत्या केली. त्यामुळे गांधीजीला वाटले की, देश अजूनपर्यंत मोठ्या प्रमाणात सविनय कायदेभंगासाठी तयार नाही. त्यामुळे १२ फेब्रुवारी १९२२ ला बारदोली येथे झालेल्या काँग्रेसच्या बैठकीत असहकार चळवळ स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा केली.

**सविनय कायदेभंग चळवळ (१९३०) :**

डिसेंबर १९२९ च्या लाहोर अधिवेशनात काँग्रेस कार्य समितीने महात्मा गांधीजींना सविनय कायदेभंग चळवळीला सुरू करण्यासाठी ठिकाण आणि विषय ठरविण्याची परवानगी दिली गेली. गांधीजींनी दांडीमधील समुद्रकिनाऱ्यावर जाऊन मिठाचा कायदा मोडून या चळवळीची सुरुवात करण्याचा निश्चय केला. मिठाला या चळवळीचा प्रमुख मुद्दा बनविण्यात आला. कारण ब्रिटीश सरकारने या अत्यावश्यक वस्तूच्या विक्रीवर नियंत्रण बसविले होते. तसेच त्यावर कर सुद्धा लावला होता. महात्मा गांधींनी १२ मार्च १९३० ला मिठाचा सत्याग्रह सुरू केला. ते आपल्या साबरमती आश्रमातून ८० सोबत्यांना सोबत घेऊन सत्याग्रहासाठी निघाले. २४ दिवसांची यात्रा करून ०५ एप्रिल १९३० ला दांडी येथे पोहोचले व ६ एप्रिल १९३० ला मिठाचा कायदा भंग केला. मिठाचा कायदा

तोडल्याने सविनय कायदेभंगाला सुरुवात झाली.

**सविनय कायदेभंग चळवळीच्या तरतुदी :**

१) मिठाचा कायदा व इतर कायद्यांचे उल्लंघन करणे.

२) जमीन कर व इतर करांचा भरणा न करणे.

३) न्यायपालिका, विधानमंडळ, निवडणुका, सरकारी समारंभ, सरकारी शाळा - महाविद्यालयांचा बहिष्कार करणे.

४) विदेशी वस्तू व कपड्यांचा बहिष्कार व विदेशी कपडे जाळणे.

५) दारू व मादक पदार्थाची विक्री करणाऱ्या दुकानांसमोर शांतीपूर्ण धरणे देणे.

६) सरकारी नोकरीचा त्याग करणे, नागरिक, सैनिक व पोलीस सेवांमध्ये भरती न होणे.

७) व्यापक स्वरूपात हरताळ आणि प्रदर्शने करणे.

**सविनय कायदेभंग चळवळीची प्रगती :**

जनतेने सविनय कायदेभंग कार्यक्रमाचे मोठ्या उत्साहाने पालन केले. संयुक्त प्रांत आणि गुजरातमध्ये कर न देण्याचे अभियान सुरू केल्या गेले. संपन्न घरातील स्त्रिया सुद्धा या चळवळीत सहभागी झाल्या. उत्तर - पश्चिम सिमा प्रांतामध्ये 'सिमांत गांधी' या नावाने प्रसिद्ध खान अब्दुल्ला खानने आपल्या 'खुदाई खिदमतगार' या संघटनेचा ध्वज व आपल्या स्वयंसेवकांसोबत या चळवळीत अत्यंत सक्रीयपणे भाग घेतला, एका वर्षाच्या कमी कालावधीमध्ये ६०,००० पेक्षा जास्त लोकांनी स्वतःला कैद करून घेतले. उत्तर - पूर्व मधील माणिपूरच्या जनजातीचे लोक सुद्धा या चळवळीत सहभागी झाले. नागा महिला राणी गैकिनलियू हिने आपल्या नागा सोबत्यांना सोबत घेऊन या चळवडीला पूर्ण समर्थन दिले. ब्रिटीश सरकारने याही चळवळीला अत्याचारी पद्धतीने दमन करण्याचा प्रयत्न केला. जून १९३० मध्ये काँग्रेस आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांना गैरकानुनी घोषित केले. महात्मा गांधी व इतर काँग्रेसी नेत्यांना कैद करण्यात आले. वर्तमानपत्रावर बंदी घालण्यात आली. या चळवळीत बरेच लोक मारल्या गेले. कराचा भरणा न केल्यामुळे हजारो लोकांच्या खाज संपत्ती व जमिनी जप्त करण्यात आल्या. याच दरम्यान व्हाईसरॉयनी महात्मा गांधींना चर्चा करण्यासाठी पाचारण केले. त्यांच्यामध्ये एक करार झाला. या करारानुसार सविनय कायदेभंग चळवळ स्थगित करण्यात आली. या करारानुसार झालेल्या समझौत्याच्या तरतुदी खालीलप्रमाणे मान्य करण्यात आल्या.

१) काँग्रेस पक्षाच्या वतीने महात्मा गांधीजी सविनय कायदेभंग चळवळीला स्थगित करण्यास सहमत झाले.

२) काँग्रेसने सवैधानिक सुधारणाचे प्रारूप तयार करण्यासाठी दुसऱ्या गोलमेज परिषदेत सामील होण्याचे मान्य केले.

३) व्हाईरॉयनी सविनय कायदेभंग चळवळीशी संबंधित जे अधिनियम केले होते ते वापस घेण्यास तयार झाले.

४) सरकार चळवळीच्या वेळी कैद केल्या गेलेल्या लोकांना सोडून देण्यास व त्यांची जप्त केलेली संपत्ती वापस करण्यास सहमत झाले.

५) सरकारी समुद्र किनाऱ्याजवळ राहणाऱ्या लोकांना निशुल्क मीठ देण्यास सहमत झाले.

**चलेजाव चळवळ (१९४२) :**

दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर जपानी आक्रमणाच्या वाढत असणाऱ्या धोक्यामुळे इंग्रज सरकारच्या

प्रती गांधीजींच्या व्यवहारात मूलभूत परिवर्तन झाले. वस्तूच्या वाढत असणाऱ्या किंमती आणि युद्धकालीन समस्यांमुळे लोकांमध्ये असंतोषाचा विस्फोट होण्याची स्थिती निर्माण झाली. प्रशांत महासागरात जपानला अचानक मोठे यश मिळाल्याने मलाया, सिंगापूर आणि रंगून जपानने जिंकले. लवकरच भारताच्या पूर्व सिमा भागावर जपानी सैन्य आक्रमण करेल अशी मोठी भिती निर्माण झाली. त्यामुळे भारतही वास्तविक युद्धाच्या कक्षात येईल असे वाटत होते. महात्मा गांधींना असा विश्वास वाटत होता की, भारतातील इंग्रजांची उपस्थिती जपानला भारतावर आक्रमण करण्याचे आमंत्रण आहे. म्हणून गांधीजींनी इंग्रजांना म्हटले की, तुम्ही आता भारताला सोडून चालते व्हा.

**चलेजाव संकल्प :**

१४ जुलै १९४२ ला वर्धा येथे झालेल्या काँग्रेस कार्य समितीच्या बैठकीत एक प्रस्ताव पारित केल्या गेला. ज्याला चलेजाव प्रस्ताव म्हटल्या जाते. ही मागणी नवीन पद्धतीने केल्या गेली. भारतातील ब्रिटीश शासन लवकर समाप्त झाले पाहिजे आणि भारताची स्वतंत्रता केवळ भारताच्याच हिताची नाही तर ब्रिटन व स्वातंत्र्याच्या उद्देशाच्या हिताची सुद्धा आहे. त्यांनी प्रस्तावात असे सुद्धा म्हटले की, जर ही मागणी यशस्वी झाली नाही तर काँग्रेसला मजबूर होऊन आपल्या सर्व अहिंसात्मक शक्तीचा वापर करावा लागेल. ज्या १९२० पासून संचित करून ठेवल्या आहेत. ०७ ऑगस्ट १९४२ च्या मुंबई येथील अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीत बऱ्याच बहुमताने वर्धा प्रस्तावाला स्वीकार केले आणि गांधीजींच्या नेतृत्वात अहिंसात्मक जनसंघर्ष करण्याची मंजुरी देण्यात आली. अशा परिस्थितीत त्यांच्या गिरफ्तारीची शंका व्यक्त केल्या गेली. जर असे झाले तर आंदोलनात भाग घेणाऱ्या पुरूष व महिलांना जे निर्देश देण्यात आले त्यानुसारच कार्य करावे असे ठरविण्यात आले. प्रत्येक भारतीय जो स्वातंत्र्य मिळविण्यासाठी इच्छा ठेवतो व त्यासाठी प्रयत्न करीत आहे त्याला स्वत:चा मार्गदर्शक स्वत:च व्हायचे आहे. त्याला असा लांब व कठीण मार्ग पार करायचा आहे. ज्यावर विश्राम करण्यासाठी कोणतेही ठिकाण नाही. जोपर्यंत स्वतंत्रता आणि भारताची मुक्तता हे लक्ष प्राप्त होत नाही. भारत सोडा प्रस्ताव पारित झाल्यानंतर गांधीजींनीही मार्गदर्शन करताना म्हटले की, आपल्यापैकी प्रत्येक व्यक्तीने स्वत:ला स्वतंत्र व्यक्ती समजले पाहिजे. आणि अशाप्रकारे कार्य केले पाहिजे की जसे आपण स्वतंत्र आहोत. मी स्वतंत्रता कोणत्याच वस्तूंनी संतुष्ट होऊ शकत नाही. आपण एकतर करू किंवा मरू. आपण भारताला स्वतंत्र करू किंवा या प्रयत्नात मरून जाऊ.

**चलेजाव चळवळीची प्रगती :**

चलेजाव प्रस्ताव मुंबईच्या ज्या ठिकाणी पारित झाला त्याला ऑगस्ट क्रांती मैदान असे म्हटले जाते. ब्रिटीश सरकार या परिस्थितीचे जवळून निरीक्षण करीत होते. या विद्रोहाला दाबण्यासाठी मोठ्या प्रमाणात तयारी करत होते. अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक ०८ ऑगस्ट १९४२ ला मध्यरात्रीपर्यंत चालली. त्याच रात्री पोलिसांनी महात्मा गांधी, मौलाना अब्दुल कलाम आझाद व सर्व प्रमुख काँग्रेसच्या नेत्यांना कैद केले. यानंतर ही चळवळ तीन स्तरात चालली. ०९ ते १३ ऑगस्ट १९४२ पर्यंत पहिल्या स्तरामध्ये मुंबई, अहमदाबाद, पुणे, दिल्ली इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात विद्रोह झाले. ११ ऑगस्ट पासून परिस्थिती वेगात बिघडू लागली, हरताळी झाल्या. सार्वजनिक हिंसेचा प्रयत्न केला गेला. तसेच सर्व प्रकारची दळणवळणाची साधने, पोलीस, सैन्य यांच्या विरुद्ध तोडफोड व विध्वंस करण्यात आले. रेल्वे, पोस्ट व इतर सेवांची नाजधूस केल्या गेली. या चार दिवसाच्या घटना 'महान ऑगस्ट क्रांती दिन' म्हणून प्रसिद्ध आहे. चळवळीचा प्रथमस्तर समाप्त झाल्याबरोबर नवीन तीन प्रवृत्या निर्माण झाल्या.

१) परंपरागत अहिंसक सविनय कायदेभंग चळवळ.

२) गंभीर गुन्ह्याच्या प्रकारात वृद्धी.

३) क्रांतिकारी हिंसेला वळण.

याच्यामुळे जाळपोळ, तोडफोड व सरकारी कर्मचाऱ्यांवर हमले, चळवळींनी जेव्हा दुसऱ्या स्तरात ग्रामीण भागात प्रवेश केला तेव्हा शहरातील विद्यार्थी येऊन त्यांनी शेतकऱ्यांच्या विरोधाला नेतृत्व केले. यावेळी संयुक्त प्रांत आणि बिहारच्या भागात मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सरकारची स्थापना केल्या गेली.

सप्टेंबर १९४२ मध्ये ही चळवळ खूप वाढत जाऊन भूमिगत बनली. या चळवळींनी आता क्रांतिकारी आतंकवादाचे स्वरूप धारण केले. यांनी संपर्काची केंद्र विस्फोट करून उडवून दिली. भूमिगत रेडिओ स्टेशनची स्थापना केल्या गेली. या स्तरातील चळवळीचे काँग्रेसी व काँग्रेसी समाजवादी नेत्यांनी नेतृत्व केले. त्यामध्ये अच्युत पटवर्धन, राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण आणि अरुणा आसफअल्ली यांनी समर्थन केले. जयप्रकाश नारायण या चळवळीचे प्रमुख नेते होते. ही चळवळ १९४३ च्या शेवटपर्यंत सुरू होती. ब्रिटीश सरकारने या चळवळीला मोठ्या क्रुरपणे दाबून टाकले. काँग्रेस संघटनेवर प्रतिबंध लावल्या गेले. लाठीचार्ज व चाबुकाने मारणे, जेलमध्ये बंद करणे, मशीन गनने गोळीबारी, विमानाने बमबारी अशा अनेक साधनांचा वापर केल्या गेला.

**निष्कर्ष :**

भारतात व ब्रिटिशांची सत्ता जवळपास १५० वर्षे होती. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर स्वातंत्र्य प्राप्तीच्या चळवळीला वेग आला. असहकार चळवळ व कायदेभंगाच्या चळवळीमुळे १९३५ चा सुधारणाविषयक कायदा भारतात मंजूर करण्यात आला. परंतु भारतीयांचे यामुळे समाधान झाले नाही. याच दरम्यान दुसऱ्या महायुद्धाने भिषण अशी परिस्थिती इंग्लंडवर आणली. तसेच जागतिक परिस्थितीही खूप बिघडली. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता काँग्रेसने आपल्या कार्यसूचीमध्ये स्वतंत्रता प्राप्तीला स्थान दिले. आणि यापासून मागे फिरायचे नाही असे ठरले. त्यासाठी महात्मा गांधीच्या नेतृत्वात चलेजाव चळवळ सुरू केल्या गेली. त्यामुळे भारतात आपण जास्त काळ राज्य करू शकणार नाही याची जाणीव ब्रिटिशांना झाली. म्हणूनच यानंतर त्यांनी जी प्रक्रिया अवलंबिली त्या सर्व प्रक्रिया भारतीयांना सत्ता हस्तांतरण करण्याच्या होत्या असे आढळून येते. महात्मा गांधीजींच्या या राष्ट्रव्यापी उभारलेल्या चळवळीमुळे १५ ऑगस्ट १९४७ ला आपला भारत देश ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला.

**संदर्भग्रंथ :**


- एस. गोपाळ, 'ब्रिटिशांची भारतातील राजनिती', डायमंड पब्लिकेशन, २००६.
- डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, 'आधुनिक भारताचा इतिहास : १०२०-१९४७', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९४.
- डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, 'स्वतंत्र भारताचा इतिहास : १९४७-१९८६', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४.
- उद्धव एंव विकास, एम. एल. धवन, 'भारत में राष्ट्रीय आंदोलन', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली २००३.

- Sekhar Bondyopadhyay (Edited), 'Nationalism Movement in India', Oxford University, Press, 2009.
- डॉ. आर. के. परूथी (संपा.), 'आधुनिक भारत : १८५८-१९०५', संघटीत राष्ट्रवाद का उदय, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००३.
- बिपीन चंद्र, मृदुला मुखर्जी, के. एन. पणीक्कर, 'भारताचा स्वातंत्र्य संघर्ष', के. सागर पब्लिकेशन, पुणे.
- डॉ. आर. के. परूथी (संपा.), 'आधुनिक भारत : समाजवाद, राष्ट्रवाद और महात्मा गांधी', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००६.
- रश्मी पाठक, 'भारत में अंग्रेजी राज', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००३.

Research Hub International Journal